**अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी निर्माण केलेल्या अधिसंख्य पदांना मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक मलोआ ११२०/प्र.क्र. १२२/२०२०/मलोआ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक – २ जून, २०२६.

**वाचा -**

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः बीसीसी २०१८/ प्र. क्र. ३८/ १६-ब, दिनांक २१ डिसेंबर, २०१९,
२) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीसीसी ११२३/ प्र.क्र. २९/ आरक्षण-२, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४,
३) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक मलोआ ११२०/प्र.क्र. १२२/२०२०/मलोआ, दिनांक ३० जुलै, २०२५,
४) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी ११२३/ प्र.क्र. २९ ए/ १६-ब, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५,
५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. अधिसं-७७२५/ प्र.क्र. ३५/ २०२५/ एक, दिनांक २१ मे, २०२६.

**प्रस्तावना –**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील श्री. वि. गो. शिरसाठ, कक्ष अधिकारी आणि श्री. प्र. फा. बटराखाये, सहायक कक्ष अधिकारी यांचे जातपडताळणी प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे त्यांना संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार २ अधिसंख्य पदे निर्माण करुन ११ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती देण्यात आली आहे. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये सदर नियुक्त्यांना दिनांक २० मे, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. शासन परिपत्रक दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय –**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील खालील तक्त्यात नमूद केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्तीस दिनांक २१ मे, २०२६ रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २२ मे, २०२६ ते दिनांक २१ एप्रिल, २०२७ पर्यंत ११ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव | शासन सेवेतील नियुक्तीचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | ११ महिन्यांच्या सेवा समाप्ती/ अधिसंख्य पदावर सेवा समाप्तीचा दिनांक | तांत्रिक खंडाचा दिनांक | नियुक्तीस पुढील ११ महिन्यांसाठी खालील कालावधीसाठी मुदतवाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.वि.गो. शिरसाठ | ०९/०१/२००९ | २८/०२/२०३८ | २०/०५/२०२६ | २१/०५/२०२६ | २२/०५/२०२६ ते २१/०४/२०२७ |
| २ | श्री. प्र. फा. बटराखाये | १०/०८/१९९३ | ३१/१०/२०३० | २०/०५/२०२६ | २१/०५/२०२६ | २२/०५/२०२६ ते २१/०४/२०२७ |

०२. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचा प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड हा दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात येत आहे.

०३. याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय/ शासन परिपत्रक तसेच वेळोवेळी सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित होणाऱ्या सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची जबाबदारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची असेल. उपरोक्त प्रमाणे मुदतवाढीचे कार्यालयीन आदेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निर्गमित करुन त्याची प्रत शासनास सादर करावी.

०४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०६०२१३३५१४२७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SMITA PRASAD JOSHI

Digitally signed by SMITA PRASAD JOSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=d759e39e5163375d3782e5f6bef7edf6a25c72797123cdaa86acd09edf52baf1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=28AA5752FA66D3A7FDEAFB1F4AB24CD90FD9D667A6880CB8CCECA18276150ACA, cn=SMITA PRASAD JOSHI
Date: 2026.06.02 13:36:54 +05'30'

**(स्मिता जोशी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र - १ मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र - १ मुंबई.
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. (पत्राने)
४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
८. उपसचिव, कार्यासन- आरक्षण-२ (१६-ब), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी (कार्यासन-आपुक), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-प्रशा-१/ प्रशा-२), मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती (कार्यासन – मलोआ).